दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक २१८ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.४ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## मोटार सायकलचा अपघातात ; १ ठार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रस्त्यात कुत्रा आडवा आल्याने त्याला वाचवण्यासाठी मोटारसायकलीचा ब्रेक दाबतात गाडी स्लिप होऊन झालेल्या अपघातात गाडीवरील चालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. फिर्यादी मितेश ढवळे (वय २० रा डोंबिवली पूर्व) हा त्यांचा मावस भाऊ कुशल मनोज सोनकर (वय-२० वर्षे )व इतर ५ मित्र असे मोटारसायकलवरून लोणावळा येथे फिरायला जात असताना पनवेल जवळील जुन्या मुंबई-पुणे हायवे, पुणे लेनवर, बारवई गावाजवळ, येथे ते आले असता कुशल सोनकर याच्या ताब्यातील टाईम्फ स्पीड ४०० कंपनीनी लाल-पांढऱ्या रंगाची मोटारसायकल क्र. एमएन ०१ ईवाय १९१३ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून रस्त्यात कुत्रा आडवा आल्याने त्यास वाचविण्यासाठी त्याच्या मोटारसायकलचा ब्रेक जोरात दाबुन मोटारसायकल थांबविण्याचा प्रयत्न केला असता त्यांची मोटारसायकल जोराने स्लीप होवून तो रस्त्यावर पडून त्यास गंभीर दुखापत होवून मोटारसायकल नुकसान करून स्वतःचे मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणार

### एसटीच्या मोकळ्या जागेवर 'सौर ऊर्जा प्रकल्प' उभारणार



**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्य परिवहन (एसटी) महामंडळ तोट्याच्या गर्तेत अडकले असून एसटीला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून उत्पन्नात वाढ करण्याचे नियोजन सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून एसटी महामंडळाच्या मोकळ्या जागेवर; तसेच कार्यशाळेच्या व बसस्थानकांच्या छतावर 'सौरऊर्जा प्रकल्प' उभारण्याचा निर्णय सोमवारी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यातून वर्षाला सुमारे ३०० मेगावॅट इतकी वीजनिर्मिती करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्याद्वारे वर्षाला सुमारे १ हजार कोटी रुपयांची वीजनिर्मिती करण्यात येईल. सौरऊर्जा प्रकल्प उभारून एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात येईल.**

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून सवलत मूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी मिळणाऱ्या रकमेवर अवलंबून राहावे लागते. तसेच, इतर खर्चात काटकसर करून एसटी महामंडळाला गाडा रेटावा लागत आहे. त्या अनुषंगाने सोमवारी मुंबई सेंट्रल येथील एसटी महामंडळाच्या सभागृहात परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सरनाईक म्हणाले की, भविष्यात संपूर्ण राज्यात पथदर्शक ठरेल असा एक महत्त्वाकांक्षी 'सौर ऊर्जा प्रकल्प' एसटी महामंडळाच्या माध्यमातून आकारास येत आहे.

या प्रकल्पांतर्गत महामंडळाच्या जागेवर खासगी- सार्वजनिक भागीदारीच्या माध्यमातून विविध विकास प्रकल्प साकारले जाणार आहेत. त्याबरोबरच उर्वरित मोकळ्या जागेमध्ये 'सौर ऊर्ज'द्वारे वीज निर्मिती करण्याचे काम हाती घेतले जाईल. सध्या एसटी महामंडळाला दैनंदिन आस्थापना वापरासाठी वर्षाला १५ मेगॉवॅट इतकी वीज लागते. त्यासाठी एकूण २५ ते ३० कोटी रुपये महावितरण कंपनीला भरावे लागतात. भविष्यात येणाऱ्या हजारो विद्युत बसच्या विद्युत प्रभारणासाठी (चार्जिंग) सुमारे २८० मेगावॅट इतकी विजेची गरज भासणार आहे. ही वीज एसटी महामंडळाने सौर ऊर्जेच्या माध्यमातून तयार केल्यास भविष्यात वर्षाला सुमारे १ हजार कोटी रुपयांची बचत होईल.

राज्यातील एसटीच्या विविध जागांवर ३०० मेगॉवाट क्षमतेचे वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. आवश्यकता भासल्यास शासनाच्या ओसाड जागेवर परवानगी घेऊन नाममात्र भाडे आकारणी करून सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून मिळणारी आर्थिक मदत यासाठी उपयोगात आणण्यात येणार आहे. त्यामुळे एसटी महामंडळाला आर्थिक अनुदानासाठी शासनाकडे वेळोवेळी हात पसरावे लागणार नाहीत, असे प्रतिपादन सरनाईक यांनी केले.

## महाराष्ट्रातील युवकांनी शिवचरित्रातून प्रेरणा घ्यावी : रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतीस माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज रायगड किल्ला येथे विनम्र अभिवादन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने आणि दूरदर्शी नेतृत्वाने स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाराष्ट्रातील युवकांनी शिवचरित्रातून प्रेरणा घ्यावी, असा संदेश दिला.या प्रसंगी त्यांनी रायगड किल्ल्यावर उपस्थित राहून महाराजांच्या समाधीस पुष्प अर्पण करून नतमस्तक होत अभिवादन केले.



यावेळी त्यांच्या समवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, बिपीन माम्हूणनकर, पनवेल पुर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, केदार भगत, रुपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे, प्रशांत मोरबाळे, आदी उपस्थित होते. यावेळी महाडकरांच्यावतीने बिपीन माम्हूणनकर व ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि उपस्थितीतांचे स्वागत केले.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२५ अंतिम आरक्षण जाहीर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२५ आरक्षण सोडतीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून शासन आदेशान्वये जिल्हा परिषद निवडणूक विभागाची व पंचायत समितीच्या निर्वाचक गणांची अंतिम आरक्षणाची अधिसूचना दि.०३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली असल्याची माहिति जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

या आरक्षण कार्यक्रमानुसार दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या व पंचायत समितीच्या निर्वाचक गणांचे आरक्षण निश्चित करण्यात आले असून, प्रारुप आरक्षणाची अधिसूचना दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. दि. १४ ऑक्टोबर ते दि.१७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत प्रारुप आरक्षण अधिसूचनेवरील हरकती व सूचना स्विकारण्यात आल्या आहेत.

ही अंतिम आरक्षण यादी संबधित कार्यालयाच्या सूचना फलकावर, जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालये व पंचायत समित्यांच्या कार्यालयीन सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येणार आहे.

## गौरविलेल्या सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्यांची उभारणी : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील अंगणवाड्यांना आधुनिक, सशक्त आणि पारदर्शक बनवून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत राज्यभरात व्यापक कार्यवाही सुरू आहे. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट सरपंच म्हणून गौरविण्यात आलेल्या १३ सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्या उभारण्यात आल्या असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.



महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, १३ गावांतील अंगणवाड्यांना स्मार्ट स्वरूप देण्यात आले आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा, डिजीटल शिक्षण साधने, तसेच बालक आणि मातांसाठी आरोग्य व पोषण जनजागृती उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण झाल्याचा मनस्वी आनंद आहे. एकात्मिक बालविकास सेवा (आयसीडीएस) योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये बालकांना आरोग्य, पोषण आणि पूर्व-प्राथमिक शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत मूलभूत सेवा पुरविल्या जातात. या अंगणवाड्यांना स्मार्ट बनविण्याच्या उपक्रमामुळे त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, शिक्षण आणि पोषण सेवा अधिक प्रभावी पद्धतीने दिल्या जात आहेत.

महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हणाल्या की, स्मार्ट अंगणवाडी हे केवळ इमारतीचे नव्हे, तर बालक आणि मातांच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि संवेदनशील दृष्टिकोन यांचा संगम घडवून अंगणवाड्यांना आदर्श केंद्र बनवण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून, राज्यातील सर्व अंगणवाड्यांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट स्वरूप देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

## जन्मदात्या आई-वडिलांचा दोन सख्या भावांनी घेतला जीव

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील सुसंस्कृत आणि शांततेसाठी ओळखल्या जाणाऱ्या मेंदडीकोंड गावात रविवारी एक हृदयद्रावक घटना घडली. गावातील दोन सख्या भावांनी स्वतःच्या जन्मदात्या आई-वडिलांचा गळा घोटून खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून परिसरात भीती आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावातील महादेव कांबळे (वय ९५) आणि विठाबाई कांबळे (वय ८३) यांचा मृतदेह घरात आढळून आला. सुरुवा-तीला हा अकस्मात मृत्यू असल्याची नोंद म्हसळा पोलिसांनी केली होती. मात्र, सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र पारखे आणि उपनिरीक्षक सुनिल कोहीणकर यांनी केलेल्या चतुरस्त्र तपासात संशय वाढला.

यानंतर मुलगी अर्चना भालचंद्र पाटील (वय ४०, रा. शिस्ते, ता. श्रीवर्धन) हिने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक ७५/२०२५ नोंदवण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१) आणि ३(५) अंतर्गत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक आरोपी: नरेश महादेव कांबळे (वय ६२, मजूर) चंद्रकांत महादेव कांबळे (वय ६०, निवृत्त कर्मचारी) म्हसळा पोलिसांनी केवळ १२ तासांत आरोपींना अटक करून तपास पूर्ण केला.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अचल दलाल, उपविभागीय पोलिस अधिकारी अभिजीत शिवतारे, महाड उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, आणि म्हसळा ठाण्याचे सपोनी रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या तात्काळ आणि काटेकोर तपासामुळे म्हसळा पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### अहिल्या नगर जिल्ह्यात कोर्टाच्या आवारात वकिलास मारहाण

## माणगांव वकील संघटनेकडून घटनेचा निषेध

**दै.रायगड नगरी । वावेदिवाळी इंदापूर**

अहिल्यानगर जिल्हातील तालुका शेवगाव या कोर्टात वकिलास एका पक्षकारांकडून जबर माराहाण झाली असल्याने या घटनेचा निषेध म्हणून माणगांव बार असोसिएशन कडून सोमवार दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी माणगांव जिल्हा सत्र न्यायालयच्या प्रांगणात सर्व माणगांव बार असोसिएशनचे वकील एकत्र येऊन या घटनेचा त्यांनी लाल फिती बाधून जाहीर निषेध केला.

यावेळी माणागांव बार असोसिएशनचे अध्यक्ष मोहन मेथा यांनी निषेध व्यक्त करताना सांगितले की अहिल्या नगर जिल्हातील तालुका शेवगाव कोर्टातील वकिल यांना एका पक्षकारांने मारहाण केल्याने आम्ही माणगांव तालुक्याती वकिल या घटनेचा जाहीर निषेध करत आ-होत. त्यांनी पुढे बोलताना सांगितले की न्यायपालिका हा देशातील सर्वात मोठा स्तंभ असून न्यायपालिके मार्फत सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम केले जाते आणि त्याच पवित्र न्याय स्तंभाचे आम्ही घटक असताना अशा प्रकारच्या जर का घटना घडत असतील तर ते आक्षेपर्ह आहे. बार कौन्सिल महाराष्ट्र ऑफ गोवाच्या निर्देशा प्रमाणे आम्ही हा निर्देश नोंदवत असून विधि मंडळाला आमची अशी विनंती असेल की त्यांनी लवकरच वकिल सर्वेक्षण कायदा पारीत करावा असे शेवटी त्यांनी सांगितले.

यावेळी निषेध करताना उपाध्यक्ष ॲड.मालोरे, ॲड. महेंद्र मानकर, सहसचिव ॲड. सुजित मेहता, ॲड.यशवंत साधू, ॲड.नितिन आंब्रे, तसेच वकील संघटनेचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



## पनवेल महानगरपालिकेत 'लोकशाही दिन' निमित्त नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पन-वेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये आज दिनांक ०३ नोव्हेंबर रोजी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गादर्शनाखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले.



आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा विभाग व इतर असे चार अर्ज दाखल झाले होते, या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते,उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, प्रभाग अधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आ-पले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

# ‘सत्या’च्या मोर्चात ‘महा-मनसे’

महा-मनसे, असे नवीन समीकरण शनिवारच्या मुंबईतील ‘सत्याचा मोर्चा’मध्ये बघायला मिळाले. महाविकास आघाडी अधिक राज ठाकरे यांचे शक्तिप्रदर्शन अर्थातच मोठे होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महा-मनसे असे समीकरण कायम राहण्याची शक्यता कमी असली, तरी सहभागी झालेल्या प्रत्येकच पक्षाला या मोर्चाने ताकद दिली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी ‘अशीच एकजूट ठेवा’, हा जो सल्ला त्यांच्या भाषणात दिला त्याचा सन्मान करत सगळे निवडणुकीतही एकत्र राहतील, याची खात्री आज कोणीही देऊ शकत नाही. २०१९ मध्ये टोकाचे वैचारिक मतभेद असलेल्या पक्षांना एकत्र आणले होते आणि उद्धव ठाकरेंचे सरकार स्थापन झाले. आता तोच धागा पुढे नेत राज ठाकरेंनाही सहभागी करून घेतले, तर त्याचा फायदा विरोधकांना होईल. भाजप-महायुतीच्या विरोधात सर्व विरोधी पक्ष एकवटून लढतील न लढतील; परवाच्या मोर्चाने विरोधकांमध्ये जान आणण्याचे काम निश्चितच केले आहे. काँग्रेस या मोर्चात सहभागी होणार की नाही, याविषयी माध्यमांतून अनिश्चितता व्यक्त केली जात होती, पण बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार हे मोठे नेते आले. बिहार निवडणुकीची किनार असल्याने राज यांच्याबरोबर दिसू नये म्हणून आणि ‘एकला चलो रे’च्या मार्गावर प्रदेश काँग्रेसला नेण्याची इच्छा असल्याने हर्षवर्धन सपकाळ सहभागी झाले नसावेत, पण त्यामुळे विरोधकांची एकजूट रोखली गेली नाही. शरद पवार आणि काँग्रेस या दोघांचा मोर्चात सहभाग असला, तरी वरचष्मा ठाकरे बंधूंचाच होता. मुळात शिवसेनेचे राजकारण हे आक्रमक वा हिंसक प्रतिक्रियेचे राहिले आहे आणि काही वर्षांपासून दुरावलेले राज ठाकरे आता उद्धव यांच्यासोबत आल्याने खळ्ळखट्ट्याकच्या दिशेने ते पुन्हा एकदा जाताना दिसत आहेत. मतचोरी आणि दुबार मतदार दिसला की, त्याला बडवा, असा ‘आदेश’ ठाकरे बंधूंनी मोर्चात दिला आहे. काँग्रेसला तो कितपत रुचेल हा प्रश्नच आहे. अशा हिंसक प्रतिक्रियेचे राजकारण काँग्रेस कधीही करत नाही. त्यामुळे ठाकरे बंधूंनी मंचावरून बडवातुडवाची भाषा केली, तेव्हा थोरातांना कसनुसे झाले असेल. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे हे काँग्रेस आणि तेव्हाच्या एकत्रित राष्ट्रवादीसोबत गेले, तेव्हा तिघांमध्ये लिखित असा कोणताही किमान समान कार्यक्रम नव्हता. मात्र, स्वत:ला कुठे मुरड घालायची याचे भान उद्धव ठाकरे यांनी ठेवले आणि काँग्रेस-शरद पवारांच्या धर्मनिरपेक्ष राजकारणाला छेद जाईल, त्यातून अंतर्गत मोठे मतभेद निर्माण होऊन महाविकास आघाडी फुटेल, अशी कोणतीही भूमिका त्यांनी घेतली नाही. मात्र, राज ठाकरे यांना भविष्यात सोबत घेतले, तर ते अशी समंजस भूमिका घेतीलच याची खात्री नसल्याने त्यांना महाविकास आघाडीत घेण्यास काँग्रेस आणि शरद पवार यांच्या पक्षाचीही तयारी दिसत नाही. राज यांचे लहरी राजकारण काँग्रेसच्या पचनी पडणार नाही. मात्र, कालच्या मोर्चाला मिळालेला मोठा प्रतिसाद लक्षात घेता भाजपविरोधात सगळ्यांनीच एकत्र यायला हवे, अशी लोकेच्छाही दिसून आली. या लोकेच्छेचा सन्मान झाला अन् सगळे एकत्र राहिले, तर मुंबईसह राज्यात वेगळे चित्र दिसू शकेल. मतदार याद्यांमधील घोळाविरुद्ध विरोधक एकवटले आहेत, पण याबाबत त्यांच्या भूमिकांमध्ये मात्र विसंगती दिसते. ‘मतदानाला आलेला कोणी मतचोर वा दुबार मतदार दिसला, तर त्याला बडवा’ असे ठाकरे बंधू म्हणतात, तेव्हा निवडणुका होणार याला त्यांचा विरोध नसल्याचे त्यातून ध्वनीत होते. त्याचवेळी वर्षभर निवडणुका नाही झाल्या, तर काय फरक पडतो, असेही राज ठाकरे म्हणतात. मतदार याद्या दुरुस्त केल्याशिवाय निवडणुका होताच कामा नयेत, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे. सदोष मतदार याद्यांवरून न्यायालयात जाणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणतात. हे सगळे बघता कालच्या मोर्चाने विरोधकांची एकजूट दाखविली असली, तरी त्यातील भाषणे बघता भूमिकेबाबत एकवाक्यतेचा अभाव दिसतो. एकजूट दाखवतानाच भूमिकेची एकवाक्यताही विरोधक दाखवू शकले, तर त्यांना अधिक बळकटी मिळू शकेल. दुसरीकडे राज्य निवडणूक आयोग चार-पाच दिवसांत नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याच्या तयारीत आहे. अशावेळी महा-मनसे नेमकी काय भूमिका घेणार, हे महत्त्वाचे आहे.

# ठेकेदार होण्यासाठी राजकारणात आलेल्यांना उमेदवारी की निष्ठावंतांना संधी!

**दै.रायगड नगरी । तळा**

जिल्हापरिषद पंचायत समितीची निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतशी राजकीय वातावरण चांगलेच तापत असल्याचे चित्र दिसून येत आहे.सर्वच पक्षात अनेकजण इच्छुक आहेत प्रत्येकानी आपल्या पद्धतीने तिकीट मिळविण्याचा प्रयत्न चालविला आहे. काही जण सुतारवाडी तर काही जण ढालकाठीत तळ ठोकुन आहेत.कुणीही ठामपणे आपल्याला उमेदवारी मिळेल हे सांगत नाही.परिणामी उमेदवार कोण याचीच चर्चा सर्वत्र दिसत आहे.गावागावातील चर्चातही राजकारण हाच विषय असून कोणाला उमेदवारी मिळणार हे चविष्टपणे चर्चिले जात आहे.

मागील अनेक वर्षांपासुन काही कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठेकेदारीसाठी वापर करून रग्गड कमाई केल्याचे चित्र ग्रामीण तालुकास्तरवार दिसून येत आहे.आणि हे ठेकेदार आता निवडणुकीत उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढवताना संबंधित उमेदवार या संस्थांचा ठेकेदार नसावा, अशी अट घातली आहे. उमेदवारी अर्ज सादर करताना विविध सुमारे बारा प्रमाणपत्रासोबत ठेकेदार नसल्याचेही प्रमाणपत्र उमेदवारांना सादर करावे लागणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद पंचायत समितीच्या सदस्यत्वाचा फायदा घेऊन स्वत:च्याच तुंबड्या भरणाऱ्या अशा जनप्रतिनिधींना राजकीय पक्षाकडून उमेदवारी दिली जाते की, निष्ठावंतना संधी दिली जाते हे औत्सुक्याचे ठरणार आहे .

सत्ताधारी पक्षातील ठेकेदार असलेल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून तळा तालुक्यात करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या शासकीय निधीचा अपव्यय करणार्या स्वपक्षातील ठेकेदार कार्यकर्ते यांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना निवडणुकीत तिकीट देणार की निष्ठावंतांना संधी देणार ? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.सुरवातीला सामाजिक कार्यकर्ता कालांतराने ग्रामपंचायत सरपंच,उपसरपंच,जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य असलेल्या अनेकांनी आतापर्यंत ठेकेदारीचा ‘धंदा’ सुरू करून आपला खिसे गरम केल्याचे वास्तव आहे. त्यातच अशा ठेकेदारांनी केलेल्या कामांचा दर्जा कुण्याही गावखेड्यात गेल्यानंतर दिसून येतो. यामध्ये डांबरीकरण,अंतर्गत रस्त्यासाठी ठोकळे,सामाजिक सभागृह,विशेष करून जलजीवन योजनांची जी कामे करण्यात आली आहेत ती सर्व कामे निकृष्ट दर्जाची असून आजही या योजना अर्धवट आहेत योजनांना दोन वर्षांचा कालावधी लोटून गेला तरी देखील फिल्टर,सौरऊर्जा बंद आहेत याबाबतीत अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत परंतु ठेकेदार हा पक्षाचा कार्यकर्ता असल्याने त्याच्यावर कोणतीही कारवाई न होता त्यांना पाठीशी घातले जाते,त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत ठेकेदारांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी दिल्यास त्याचा मोठ्या प्रमाणावर फटका राजकीय पक्षांना बसणार असल्याची जोरदार चर्चा सर्वत्र सुरू आहे.

राजकारण करणाऱ्यांनी ठेकेदार बनू नये आणि ठेकेदारी करायची असेल, तर राजकारणात येऊ नका, अशी सूचना उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी बारामतीतील पिंपळे येथील ग्रामसचिवालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी काही दिवसांपूर्वी केली होती. ना.अजितदादा म्हणाले की, ‘राजकारण करायचे असेल त्यांनी ठेकेदार बनू नये आणि ठेकेदार व्हायचे असेल, तर त्यांनी राजकारणात येऊ नये. ठेकेदार चांगला असेल, तर विकासकामेही चांगली होतात, अन्यथा सरकारला त्रास होतो.’ तळा तालुक्यात देखील तीच परिस्थिती असल्याने खा.सुनील तटकरे येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत ठेकेदार होण्यासाठी राजकारणात आलेल्यांना उमेदवारी देणार की पक्षातील निष्ठावंतांना संधी देणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.

# ५० लाख १७ हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्टॉक मार्केटिंग बाबत माहिती देणार असून त्यात ट्रेडिंग करण्यास सांगून पन्नास लाख १७ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी प्रगती बगाड़िया या महिलेविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विश्वजीत बसक हे खारघर, सेक्टर ४ येथे राहत असून त्यांना प्रगती नामक महिलेकडून स्टॉक मार्केटिंग बाबत माहिती देणार असल्याचा मेसेज आला. यावेळी ते व्हाट्सअप वर बोलू लागले. त्यांना लिंक पाठवन फॉर्म भरण्यास सांगितला. त्यानंतर एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगितला,

यावेळी खात्यामध्ये दहा हजार रुपये पाठवले. त्यानंतर ५० लाख रुपये इन्वेस्ट करा आणि रकमेच्या २० टक्के नफा मिळेल असे सांगितल्याने त्यांनी पैसे पाठवले. त्यांना ८६ लाख रुपये नफा दाखवला, पैसे काढण्यास गेले असता पैसे काढता येणार नाहीत आणखी ५० लाख रुपये इन्वेस्ट करा मग पैसे येतील असे सांगितल्यानंतर त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीची आगामी निवडणुकी संदर्भात बैठक संपन्न; पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष निलेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल तालुका व पनवेल शहरातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक शासकीय विश्रामगृह पनवेल येथे संपन्न झाली.

या बैठकीला महाराष्ट्राचे सहसचिव अरुण जाधव, महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष अरुण धिवर व राजेश हाटे उपस्थित होते. ६ डिसेंबर २०२५ रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन दरवर्षी संपन्न होत आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून ही आजची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे लवकरच मिनी विधानसभा म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. पक्षाची ज्या ज्या ठिकाणी ताकद आहे व जिथे तिथे कार्यकर्ते आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये त्या त्या ठिकाणी पक्षाचे उमेदवार उभे करण्याविषयी चर्चा करण्यात आलेली आहे. रायगड जिल्ह्यातील आजची ही पहिल्या टप्प्यातील पनवेल येथील बैठक संपन्न झालेली आहे . यानंतर पेण, महाड, माणगाव , तळा , श्रीवर्धन, कर्जत खालापूर या ठिकाणी सुद्धा बैठकांचं आयोजन टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे . आजच्या या बैठकीमध्ये श्रीवर्धन तालुक्याचे अध्यक्ष म्हणून संयोग लोखंडे यांची निवड करण्यात आलेली आहे.

या बैठकीला सातारा संपर्कप्रमुख विलास नांगरे उपस्थित होते. त्याचप्रमाणे पनवेल तालुक्यातून महिला आघाडी अध्यक्ष ममताज पठाण, समाधान कांबळे, चंद्रकांत वेळासकर, आसिफ शेख, जावेद मास्टर, दिलीप नाईक , विनोद धावारे ,समाधान कांबळे, नरेश परदेशी, मयूर गायकवाड, सुमन पाटील , इत्यादी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# भेंडखळ गावात भागवत एकादशी उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ गावात भागवत एकादशी विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे उत्साहात साजरी करण्यात आली.दिवाळीनंतर येणारी भागवत एकादशी म्हणजे पंढरपूर यात्रेला वारकरी संप्रदायात विशेष महत्त्व आहे.त्यानुसार रविवारी भेंडखळ येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात एकादशीचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी सकाळी काकड आरती, अभिषेक,भजन,प्रवचन, महाआरती, किर्तन, अन्नदान,पालखी आदि आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येत असून दिवाळीत येणारी भागवत एकादशी हा महत्त्वाचा सण ही यावर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भेंडखळ गावातील ग्रामस्थ साजरा केला आहे.यावेळी जरी मरी आई नवरात्रौत्सव मंडळ भेंडखळ यांच्या माध्यम्यातून भागवत एकादशी निमित्ताने भेंडखळ गावातील श्री विठ्ठल रखुमाई पालखी सोहळ्या प्रसंगी आलेल्या भाविकांना ,खेळणीवाले, पाळणीवाले यांच्या साठी अन्नदान करण्यात आले .

व हा उपक्रम सातत्याने ९ वर्ष राबवण्यात येत आहे . मंडळाचे अध्यक्ष किरण अनंत घरत. उपाध्यक्ष जन्मेंजय भोईर, सौ. रेखा ठाकूर सचिव अक्षय भोईर, कौशिक भोईर प्रा.प्रांजल भोईर प्रा.भूषण ठाकूर,राजेश द्वारकानाथ ठाकूर,प्रथम घरत, संकेत ठाकूर,उमंग भोईर, आरपीआय उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते शिवाजी ठाकूर, व्यवसायिक वाद्यवृंद निर्माते दत्ता भोईर व फ्रेंड्स सामाजिक कलामंच अध्यक्ष चंद्रविलास घरत, मनसे अध्यक्ष राकेश भोईर यांनी विशेष मेहनत घेतली.




## जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. गजानन सुर्यकांत भोसले राहणार फ्लॅट नं. बी- १०४, विक्रम टॉवर को-ऑप हौसिंग सोसायटी लिमीटेड, प्लॉट नं. २, सेक्टर -१०, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०९ यांची परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत माझे अशिल श्री. राजेंद्र काकासो कदम, राहणार फ्लॅट नं.९०३, नववा मजला, बिल्डींग नं.८, अमरांते को- ऑप हौसिंग सोसायटी लिमीटेड, प्लॉट नं. ०४, सेक्टर नं. ९ई, कळंबोली, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१८ यांनी करारनामा करुन विकत घेण्याचे ठरवलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**रुम नं.०४, प्लॉट क्रमांक - बी-२,**
**समाधान को-ऑप हौसिंग सोसायटी लिमीटेड.,**
**सेक्टर-१४, कळंबोली,**
**ता. पनवेल, जि. रायगड,**
**क्षेत्रफळ ३२.०० चौ.मी. (बिल्ट अप एरिया)**

वर वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सदर जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास हि नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे ०७ दिवसात खालील पत्त्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडुन दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

दि.०४/११/२०२५
ठिकाण : पनवेल

सही/-
**ॲड.सुनिल एन. मोरे**
**ऑफीस नं. ३०६०, बिमा कॉम्प्लेक्स,**
**सेक्टर के डब्ल्यु सी, कळंबोली ता. पनवेल,**
**जि. रायगड- ४१०२१८**
**मो. ८३६९४६५७९९**



## माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

**माथेरान, ता. कर्जत, जिल्हा रायगड. ४१०१०२, ई-मेल आयडी:** mcomatheran@gmail.com

**जावक क्र. मागिनप: ८२४: २०२५-२६** **दिनांक : ०३/११/२०२५**

### जाहीर प्रकटन

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यांमुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७१/२०१३ भी सुनावणी दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न आली असून सादर सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत प्राप्त होणा-या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यांमुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद | सदस्य |
| २ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग | सदस्य |

तरी माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, माथेरान जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांबाबत माथेरान गिरीस्थान नगरपरिषद कार्यालयात तसेच कार्यालयात mcomatheran@gmail.com या ई-मेल आयडी वर तक्रार दाखल करता येईल.

सही/-
**(राहुल इंगळे)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**



## कर्जत नगर परिषद

**ता. कर्जत जि. रायगड पिन ४१०२०१**
E-mall: karjatcounell@gmall.com

**जावक क्र. क.न.प./यां.वि./२१२५/२०२५-२६** **दिनांक : ०३/११/२०२५**

### जाहीर प्रकटन

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यांमुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७१/२०१३ ची सुनावणी दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झाली असून सादर सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत प्राप्त होणा-या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यांमुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अख्त्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबावत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद, कर्जत | सदस्य |
| २ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग | सदस्य |

तरी कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांबाबत कर्जत नगरपरिषद कार्यालयात तसेच कार्यालयात karjatcouncil@gmail.com या ई-मेल आयडी वर तक्रार दाखल करता येईल.

सही/-
**(तानाजी चव्हाण)**
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तांची जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्राना भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त कैलास पगारे व विजय क्षीरसागर यांनी रायगड जिल्ह्यातील पेण, सुधागड व खालापूर तालुक्यातील प्रधानमंत्री जनजाती अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्राना भेट देत अंगणवाडी कामकाज बाबत माहिती घेतली. तसेच आदिवासी विकास विभागाच्या बहुउद्देशीय केंद्राची पाहणी करून आदिवासी वाडीवरील ग्रामस्थांसोबत संवाद साधला.

पेण तालुक्यातील मालवाडी या आदिवासी वाडीवरील अंगणवाडी केंद्राचे उद्घाटन कैलास पगारे यांच्या हस्ते करण्यात आले. एकात्मिक बाल विकास प्रकल्प मार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लेक लाडकी योजना पात्र लाभार्थींना धनादेश वाटप, मातृ वंदना योजना पात्र लाभार्थी ना पहिला हप्ता वितरण प्रमाणपत्र वाटप, बेबी केअर किट वाटप, अंगणवाडीतील बालकांना विद्यारंभ प्रमाणपत्र वाटप, गरोदर माता ओटीभरण, ६ महिने पूर्ण बालकाला अन्नप्राशन कार्यक्रम, नवचेतना मेळावा, आधार कॅम्प आयोजन तसेच पोषण माह २०२५ मध्ये उत्कृष्ट काम केलेल्या अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका यांचा सत्कार करण्यात आला. अंगणवाडी बालकांच्या नावाने विविध फळझाडे लाऊन वुक्षारोपण करण्यात आले. खालापूर तालुक्यातील सक्षम किट प्राप्त अंगणवाडी केंद्राला भेट देऊन सक्षम किट मधील साहित्य व इन्स्टॉलेशनची माहिती घेतली. सुधागड बालविकास कार्यालय मार्फत vocal for local या संकल्पनेवर आधारीत सेविकांमार्फत तयार केलेल्या पाककृती पुस्तिकेचे

कैलास पगारे यांनी कौतुक केले. यावेळी १००० दिवस बाळाचे या पुस्तकाचे वितरण गरोदर माता, सरपंच यांना करण्यात येऊन बाळाच्या योग्य पालन पोषणासाठी पहिल्या १००० दिवसांचे महत्त्व समजाऊन सांगत अंगणवाडी सेविकांनी याबाबत जास्तीत जास्त प्रचार प्रसिद्धी करणेबाबत आवाहन केले.

सदर भेटीदरम्यान रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक, आदिवासी प्रकल्प अधिकारी, पेण, तेजस्विनी गलांडे, प्रकल्प अधिकारी प्रविण पाटील, तेजस्विता करंगुटकर, विशाल कोटागडे उपस्थित होते.

> रायगड जिल्ह्याचे पोषण अभियान व इतर सर्व योजनांमध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे काम नेहमीच उल्लेखनीय राहिले आहे. बालकांच्या योग्य पालनपोषणासाठी १००० दिवस बाळाचे याबाबत सर्व अंगणवाडी सेविकांनी जास्तीत जास्त प्रचार प्रसिद्धी करावी.
> **: कैलास पगारे, आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई.**

## अनोळखी इसमाने केली लॅपटॉपसह मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनोळखी इसमाने घरात प्रवेश करून लॅपटॉप आणि मोबाईलची चोरी केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ओमकार मर्चडे हे सेक्टर १०, कामोठे येथे राहत असून ते घरामध्ये झोपले होते. सकाळी आईने उठवले यावेळी त्यांनी मोबाईल पाहिला असता मोबाईल सापडला नाही. तसेच लॅपटॉप देखील दिसून आला नाही. अनोळखी इसमाने ते चोरून नेले. तसेच आईच्या ॲक्सिस बँकेचे अकाउंट चेक केले असता अकाउंट मधून पाच हजार रुपये दुसऱ्या अकाउंटला ट्रान्सफर झाल्याचे दिसून आले.

## भुजबळ वाडीत तुळशी विवाह संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल सेक्टर १५र,भुजबळवाडी,येथे तुलसी विवाह निमित्त संपूर्ण भुजबळ कुटुंबीय आणि तेथील रहिवासी यांनी एकत्र येऊन सामुदायिक तुळशी विवाह संपन्न केला.यावेळी मोठ्या संख्येने स्त्री-पुरुष, भुजबळ कुटुंबीय त्याचबरोबर बच्चे कंपनी हजर होते.

यावेळी माजी नगरसेवक एडवोकेट मनोज भुजबळ, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, तेजस भुजबळ, हेमंत भुजबळ, ॲड. अमित भुजबळ, ॲड . संकेत भुजबळ ॲड.मधुरा भुजबळ, ॲड. प्रियांका भुजबळ, ॲड. अंजली भुजबळ ॲड. प्रशांत भुजबळ, ॲड. सुरेखा भुजबळ, उद्योगपती शेखर भुजबळ, संतोष भुजबळ, उत्कर्ष सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राकेशजी भुजबळ, अनंत जाधव, प्रमोद भुजबळ, गोविंद भाई राजपुरोहित याची उपस्थिती लाभले. सदैव विवाह सोहळा अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला, भुजबळवाडी मधील सर्व रहिवासी एकत्र येऊन प्रत्येक सण उत्साहाने साजरा करत असतात त्याबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

---

ॲड.नेहा जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
चौकशी अर्ज क्र.१६६१/२०२४
नि.क्र.८/ड
ने.ता.०५/१२/२०२५

कै.अलख नारायण पांडे (मयताचे वारस)
१) श्रीमती.फुलकुवर पांडे
२) श्री.शशिप्रकाश पांडे
३) सौ.अर्चना उपाध्यक्ष — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

सदर जाहिर नोटीसीने कळवण्यात येते की प्रस्तुत अर्जदार यांनी मे. कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदाराचे पती कै. अलख नारायण पांडे यांचे दि. २४.१०.२०१३ रोजी नानावटी हॉस्पीटल, मुंबई येथे झाले ते राहणार डि. ४१६, शहा आर्केड, प्लॉट नं. ४ व ५, ४ था मजला, सेक्टर-६, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र - ४१०२१० येथील कायमचे रहिवासी होते मृत्यु समयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**डि. ४१६, शहा आर्केड, प्लॉट नं. ४ व ५, ४ था मजला, सेक्टर-६, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२१०**

वरील प्रमाणे कै. अलख नारायण पांडे यांचे कायदेशिर वारसदार आहेत. व त्यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. त्यासाठी प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवुन मिळण्यासाठी मे. कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारस संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन दाखल करावा. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखवल्यास सदरहु कोर्टावरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवुन यांचा हक्क शाबित दिल्यास सदरहु मयताचे मिळकतीचे वारस म्हणुन दाखला देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचे विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : ०१/११/२०२५

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्याया., पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत माझे अशिलांने खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन मालक १. श्री ओमकार अशोक फडके २. देवयानी अशोक फडके ३. श्री अक्षय अशोक फडके या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णीत जमीन मिळकत ही १. श्री ओमकार अशोक फडके २ देवयानी अशोक फडके ३. श्री. अक्षय अशोक फडके यांच्या प्रत्यक्ष वहीवाटीत व ताबे कब्जात आहे. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मोहो, ता. पनवेल, जि. रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| मोहो | १९/१ | ०-३४-०० | ५.५० |

वर्णीत मिळकती पैकी १. श्री ओमकार अशोक फडके २. देवयानी अशोक फडके ३. श्री. अक्षय अशोक फडके यांच्या मालकीचे व ताबे कब्जातील खाते क्र. ५५३ मधील क्षेत्र ०-०८-५० आकार १.३८ रू. पैसे या क्षेत्राच्या विक्री बाबत सदर जाहीर नोटीस

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे वरिल मुदतीत कोणाकडून काही लेग्खी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

दि.०३/११/२०२५
स्थळ : पनवेल

**सही/-**
**ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील**
**डी/३/१, किनारा को.ऑप.हौ.सोसायटी, बावन बंगला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १) श्री दत्तात्रेय काळया उर्फ काळुराम गायकवाड उर्फ गायकर २) श्री बाळकृष्ण काळया उर्फ काळुराम गायकवाड उर्फ गायकर ३) श्री प्रशांत हरिदास गायकवाड उर्फ गायकर राहणार पापडीचा पाडा, तालुका पनवेल, जिल्हा रायगड यांना सिडको लि, कडून मौजे नोड तळोजा, येथील फाईल नं. ३०६ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतक-यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन त्याप्रमाणे सदर भूखंडाचा करारनामा झाला आहे त्याप्रमाणे माझे अशिल १. अमीर अब्दुल आर हमदुले २० मुस्तफा हकीमुद्दीन लकडावाला (५० टक्के भाग) कार्यालयीन पत्ता: शॉप नं १०,११,१२,१३, ए के ओरीयन, प्लॉट नं ४, सेक्टर १६, तळोजा फेज २, २. मे श्री कन्स्ट्रक्शन तर्फे प्रो. प्रा. श्रीमती वैजयंती नितीन म्हात्रे (५० टक्के भाग) राहणार : ऑफीस नं. ७०३, जीऑन बिल्डींग, प्लॉट नं. २७३, सेक्टर १०, खारघर, ४१०२१० यांनी खालील वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, विकासकरारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल क्रमांक : ३०६ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | भूखंड क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | ०२ | १४१ | १४९.९१ |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, वक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.०३/११/२०२५

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.१२, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

---

अर्जदार यांचे वकील
ॲड.प्रदीप तु. मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथिल मा. दि. न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौकशी अर्ज क्र.१०५०/२०२५
नि.क्र.८
ने.ता.०९/१२/२०२५

१) श्री. सुधाकर भाऊ पाटील,
उ.व. ५३, धंदा व्यवसाय,
२) श्री. शशिकांत भाऊ पाटील,
उ.व. ५२, धंदा काही नाही,
३) श्री. राम भाऊ पाटील
उ.व. ४६ धंदा ॲटो रिक्षा,
४) श्रीमती. सुलोचना भाऊ पाटील,
उ.व. ६९, धंदा घरकाम,
अं. क्रं. १ व ४, रा. चिंचपाडा,
(वडघर) ता. पनवेल. जि. रायगड.
५) सौ. प्रेमा संतोष सुरते
उ.व. ४९, धंदा घरकाम,
रा. घर नं. ९५४, हनुमान नगर,
विस्पुते कॉलेज जवळ, विचुंबे.
ता. पनवेल, जि. रायगड.
६) सौ. आशा परशुराम पाटील
उ.व. ४२, धंदा घरकाम,
रा. घर नं. ५४, देवकी निवास, हनुमान मंदीर जवळ,
मोठाखांदा. ता. पनवेल, जि. रायगड. — अर्जदार
वि.
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै. भाऊ कान्हा उर्फ काना पाटील यांचे दिनांक २७/०१/२०२५ रोजी, रा. भाऊ रेसिडेन्सी, रूम नं. १०१, प्लॉट नं. ३२, सेक्टर क्रं. आर १, वडघर, ता. पनवेल. जि. रायगड, येथे निधन झाले आहे. मौजे वडघर, ता. पनवेल, जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या सदर संपादीत मिळकतीच्या भूखंडा संदर्भात वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर संपादीत मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे.

**कोष्टक (अ) मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | यु.के.नं. |
|---|---|---|---|
| वडघर | ३९/२ ब | ०-४८-८ | ७९ |
| | १३०/४ अ | ०-२९-५ | ७९ |
| | ११५/५ ब | ०-१४-२ | ७९ |
| | १०८/५ | ०-४४-८ | |
| | ११०+१११+११२/३अ+८ | १-०७-८ | ५३ |
| | ८२/३अ+३ब+३क+२ | ०-०८-१ | ५३ |

वरील नमुद युनिट केस नं. ७९ मधील संपादीत शेतजमीनीबाबत सिडकोच्या १२.५ टक्के गावठाण विस्तार योजणे अंर्तगत करंजाडे नोड, भुखंड कमांक १९, सेक्टर- १, एकुन क्षेत्र ४९७.०२ (चौ.मी.) या भूखंडा बाबत कै. भाऊ कान्हा उर्फ काना पाटील यांचे नावे सदनिका रूम नं. २०५, शेअर्स सर्टीफिकेट नं. १५, रूषभ को.ऑ.हौ. सोसायटी ली. करंजाडे नोड, प्लॉट नं. १९, सेक्टर क्रं. १, सोसायटी रजिस्टर नं. NBOM/CIDCO/HSG /(TC)/ 6796/JTR /YEAR 2016-2017 DATE 19/01/2017 असा आहे.

तसेच कै. भाऊ कान्हा उर्फ काना पाटील व इतर यांची मौजे वडघर, ता. पनवेल, जि.रायगड. येथिल सामाईक मालकीची सात बारा सदरी शासना तर्फे (मे. आयुक्त मुंबई विभाग यांचे नोटीफिकेशन क्रं. एल. क्यु.सी. दिनांक ३/०२/१९७०) नुसार भू-संपादनात समाविष्ठ असलेली खालील वर्णनाची शेतजमीन मिळकती आहेत.

**कोष्टक (ब) मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| मौजे वडघर | ५८/१ | ०-१३-५ | ०.२५ |
| | ६२/३ | ०-१४-० | ०.०९ |
| | ११५/५ क | ०-०६-० | ०.०६ |

कै. भाऊ कान्हा उर्फ काना पाटील यांचे पश्चात संपादीत मिळकती बाबत सिडको कडुन मिळणा-या अविभक्त भुखंडा मधील हिश्याबाबत तसेच संपादनात समाविष्ठ शेतजमीन मिळकतीं बाबत अर्जदार क्रं. १ ते ६ यांनी वारस दाखला मिळणेकरीता या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै. भाऊ कान्हा उर्फ काना पाटील, यांना अर्जदार क्रं. १ ते ६ हेच सदर मिळकती संदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा. न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरीतीने हरकती न घेतल्यास हे मा. न्यायालय अर्जदार १) श्री. सुधाकर भाऊ पाटील, २) श्री. शशिकांत भाऊ पाटील, ३) श्री. राम भाऊ पाटील ४) श्रीमती. सुलोचना भाऊ पाटील ५) सौ. प्रेमा संतोष सुरते ६) सौ. आशा परशुराम पाटील हे मयत भाऊ कान्हा उर्फ काना पाटील, यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३१/१०/२०२५ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | A.T.Anuse, Superitending Engineer CIDCO (Air-port), Office :-2nd Floor, Tower No.10, Belapur Station, CBD Belapur, Navi Mumbai-400614 | ३४ सुबाभूळ, ०२ जांभूळ, १० करंज, १० सप्तपर्णी, २३ काजू, ०७ पेरु, ०१ काशिद, ०७ चारकोल ट्री, ०८ साग, ०५ रेन ट्री, ०४ देशी बदाम, ०८ पिचकारी, १३ गुलमोहर, ०५ निम, १७ कदंब, १० उंबर, ०१ विलायती चिंच, ०१ वावळ, ०४ मोठी महोगनी, १३ कांचन, ०१ फणस, १३ सोनमोहर, ०१ बोर, ०१ पिंपळ, ०१ चेरी, ०१ काटेसावर, ०२ गुलाबी टॅबेबिया, ०३ बारतोंडी, ०८ बहावा, ०१ ऑस्ट्रेलियन बाबुळ, ०६ आंबा, ०२ भेंडी व ०१ मार्खमीया अशी एकूण २२४ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा एमआयडीसीजवळील मौजे चाल येथे ३४ सुबाभूळ, ०२ जांभूळ, १० करंज, १० सप्तपर्णी, २३ काजू, ०७ पेरु, ०१ काशिद, ०७ चारकोल ट्री, ०८ साग, ०५ रेन ट्री, ०४ देशी बदाम, ०८ पिचकारी, १३ गुलमोहर, ०५ निम, १७ कदंब, १० उंबर, ०१ विलायती चिंच, ०१ वावळ, ०४ मोठी महोगनी, १३ कांचन, ०१ फणस, १३ सोनमोहर, ०१ बोर, ०१ पिंपळ, ०१ चेरी, ०१ काटेसावर, ०२ गुलाबी टॅबेबिया, ०३ बारतोंडी, ०८ बहावा, ०१ ऑस्ट्रेलियन बाबुळ, ०६ आंबा, ०२ भेंडी व ०१ मार्खमीया अशी एकूण २२४ झाडे पनवेल महानगरपालिकेच्या विद्यमान घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला लागून भविष्यातील विस्तारासाठी अतिरिक्त भूखंडाभोवती परिघीय मार्ग व S.W.Drain चे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(स्वरुप खारगे)**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. PMC-PARK/576/2025-PTAD

---

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that, my client intends to Purchase the below mentioned from the below mentioned land owner with all their shares, rights, title and interest of land property described in the schedule hereunder written. The land location at Post: Akulwadi, Post. Gulsunde, Taluka Panvel, District Raigad -410207.

All persons having rights, title, benefits, interest, share, claim or demand in respect of the below mentioned property and or any part/s thereof by way of sale, transfer, exchange, lease, sub lease, assignment, Mortgage, Charge, lien, inheritance, bequest, succession, gift maintenance, easement, trust, tenancy, sub tenancy, leave and license, care takers basis, occupation, possession, family arrangement/ settlement, decree or order of any court of law, contracts /agreements or otherwise howsoever are hereby required to make the same the same known in writing along with documentary evidence, to the undersigned. within 14 days from the date hereof, failing which such claims, if any shall be deemed to have been waived.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

| Village | Survey No. & Hissa No. | Area H-R-Sq., Mtrs | Aa-kar | Owner Name |
|---|---|---|---|---|
| Mauje : Akulwadi Post. Gulsunde Tal.Panvel Dist.Raigad | 111/1/A | Total area 0.40.50 Out of total area we interested in 0.27.00 guntas | 5.56 | Mr. Ramchandra Narayan Patil |
| | Total Area | 0.27.00 | | |

Date: 04/11/2025
Place: Panvel

**Sd/-**
**Adv. Tanuja N. Lomate**
**(Advocate of High Court)**
**(B. Com., LLM. DCL, ADR)**
**Off Add: Shop No. 05, Aayushi Pride C. H. S. Ltd., Plot No. 69, Sector-04, Karanjade, Taluka Panvel, District Raigad-410206.**

# भूमिपुत्रांनो, जागे व्हा, परप्रांतीय झोपड्या बांधून मोठे होतील : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उलवे**

भूमिपुत्रांनो, जागे व्हा, परप्रांतीय येतील आणि झोपड्या बांधून मोठे होतील, आपण आपल्या वाढत्या गरजेनुसार घरे बांधली पाहिजेत, सिडको वा अन्य यंत्रणा तोडेल, याचा विचार करण्यापेक्षा आम्ही पिढ्यांनपिढ्या वास्तव्य करणारे येथील भूमिपुत्र आहोत, आम्हाला वाढत्या गरजेनुसार घरे बांधण्याचा अधिकार आहे, भूमिपुत्रांची शेकडो एकर गुरचरण जमीन सिडकोने फुकटात गिळंकृत केली आहे, मात्र आमच्या भूमिपुत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे अनधिकृत ठरवून तोडली जात असतील तर ते योग्य नाही. उद्या येथे परप्रांतीय येऊन झोपड्या बांधतील आणि सरकार त्या झोपड्या अधिकृत करेल, हा अलीकडचा इतिहास आहे. त्यामुळे भूमिपुत्रांनो, वेळीच सावध व्हा. पर्यावरणाच्या रक्षणासाठी झाडे लावून कटिबद्ध होऊ या, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कामगार नेते



आणि काग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी धुतूम येथे व्यक केले. रविवारी (ता. २) धुतूम ग्रामपंचायतीच्या वतीने साकव आणि क्रिकेट टर्फच्या उद्घाटनप्रसंगी महेंद्रशेठ घरत बोलत होते.

यावेळी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

यावेळी ते म्हणाले, धुतूम ग्रामपंचायतीच्या सरपंच आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन अतिशय चांगले काम करीत आहेत. ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आणि ग्रामस्थांनी जो विश्वास टाकला त्या विश्वासाला त्या पात्र ठरल्या आहेत.

धुतूम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनेक चांगली कामे होत आहेत. जो चांगले करेल त्याच्यासोबत जनता असते. धुतूम या हुतात्म्यांच्या गावाला क्रिकेट खेळाडूंसाठी मैदान मिळावे यासाठी मी प्रयत्नशील आहे. त्याचा सतत पाठपुरावा करून आपल्या सर्वांच्या सहकार्याने धुतूम गावासाठी मैदान उपलब्ध करून देणार, अशी ग्वाही महेंद्रशेठ घरत यांनी दिली.

धुतूम ग्रामपंचायतीचे काम उत्तम आहे. पर्यावरण रक्षणाची भूमिका कौतुकास्पद आहे. मी जगभर फिरतो, परंतु सध्या आपल्याकडे जो वातावरणात बदल झाला आहे, तो चिंतेचा विषय आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे महेंद्रशेठ घरत यांनी सांगितले.

यावेळी धुतूम ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचिता ठाकूर, माजी सरपंच शंकरशेठ ठाकूर, उपसरपंच सुचिता कडू, सदस्य रविनाथ ठाकूर, प्रकाश ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, सदस्या स्मिता ठाकूर, कविता पाटील, अनिता ठाकूर, करिष्मा ठाकूर, ग्रामसेवक नागनाथ घाडगे, उरण तालुका महिला इंटक अध्यक्ष कल्पना ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते नारायण पाटील, अनंत ठाकूर, माजी उपसरपंच रामचंद्र पाटील, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष महेश ठाकूर तथा श्याम ठाकूर, नंदकुमार ठाकूर, किशोर पाटील, चंद्रहास ठाकूर, वामन ठाकूर, हरी ठाकूर, मनोज ठाकूर, काशिनाथ पाटील, राजन कडू, शरद ठाकूर, सुजित ठाकूर, नीलेश ठाकूर आणि धुतूम गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्यांनी विकास कामे केली नाहीत, त्यांना त्यांची जागा दाखवा : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माझे उत्तरदायित्व आणि सामाजिक बांधिलकी विकासकामांशी, समाजकल्याणाशी आणि जनतेच्या हिताशी घट्ट जोडलेले आहे, असे सांगत खासदार सुनील तटकरे यांनी विकास कामांना गती देण्याची ग्वाही दिली. सुतारवाडी येथे झालेल्या भव्य सभेत त्यांनी विरोधकांवर नामोल्लेख न करता जोरदार टीका केली. ज्यांनी तुम्हाला वर्षानुवर्षे आश्वासने देऊन ठेवले, विकासकामे रखडवली, त्यांना आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत जनतेने त्यांच्या जागी बसवावे, असा घणाघाती इशारा खासदार तटकरे यांनी दिला.




या कार्यक्रमात खासदार तटकरे यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या निधीतून लोणेरे येथील विस्तारित कुणबी भवन इमारतीसाठी २५ लाख रुपये मंजूर झाल्याचे पत्र कुणबी समाज मंडळ बावीसी तळेगाव व लोणेरे विभागाचे पदाधिकारी आणि उपसरपंच अशोक पाटील यांच्या हाती सुपूर्द केले. यापूर्वीही त्यांनी या भवनाच्या बांधकामासाठी १० लाखांची मदत दिली होती. आता विस्तारित इमारतीसाठी मिळालेल्या निधीमुळे कामाला गती मिळणार असून समाजबांधवांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

खासदार तटकरे यांनी सांगितले की, निजामपूर, गांगवली, पळसगाव, लोणेरे, गोरेगाव आणि माण-गाव परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. दिलेली प्रत्येक आश्वासने पाळली आहेत. जांभूळवाडी-पळसगाव आणि आम्रेवाडी-घरोशीवाडी हे सहा कोटींचे दोन रस्ते पंतप्रधान ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री सडक योजनेतून तातडीने पूर्ण करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

तसेच जलसंधारण विभागातील बंधाऱ्याचे काम, पाणीपुरवठा योजना आणि स्थानिक शाळांसाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री असताना या मतदारसंघात अनेक मोठी कामे मी केली आहेत आणि पुढेही जनतेच्या हितासाठी तेवढ्याच निष्ठेने प्रयत्न करत राहीन, असे तटकरे म्हणाले.

या भागात काही जण फक्त आश्वासने देऊन जनतेची दिशाभूल करत आहेत. दहा वर्षे झाली तरी त्यांच्या भागातील समस्या सुटल्या नाहीत. त्यांचे बोलणे हे फक्त भूलथापा आहेत. त्यांच्या गोड बोलण्याला बळी पडू नका, असा थेट सल्ला खासदार तटकरे यांनी दिला. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, या भागातील सर्व प्रलंबित कामे मे महिन्यापर्यंत पूर्ण करून दाखवू, हा माझा ठाम निर्धार आहे.

या सभेत उपसरपंच अशोक पाटील यांनी शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या घोषणेनंतर या भागातील अनेक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले. लोकविकासाच्या ध्येयाने कार्यरत असलेल्या खासदार सुनील तटकरे यांच्या या भाषणाने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे आणि विरोधकांमध्ये चळवळ निर्माण झाली आहे.

# वकील असिम सरोदेंची सनद ३ महिन्यांसाठी रद्द

**दै.रायगड नगरी । मुंबई**



वरिष्ठ वकील असिम सरोदे यांची सनद करण्यात आली आहे. तीन महिन्यांसाठी सरोदे यांची सनद रद्द करण्यात आली आहे. बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांनी सरोदे यांना दणका दिला आहे. राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष यांच्याबद्दल केलेलं वादग्रस्त विधान सरोदे यांना भोवलं आहे. सार्वजनिक कार्यक्रमात सरोदे यांनी राज्यपाल, विधानसभा अध्यक्षांसंदर्भात आक्षेपार्ह विधान केलं होतं. याबद्दल मार्च २०२४ मध्ये तक्रार करण्यात आली होती.

राज्यातील दोन प्रादेशिक पक्षांमध्ये पडलेली फूट, त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेली सुनावणी, निवडणूक आयोगानं दिलेला निर्णय, विधानसभा अध्यक्षांनी यासंदर्भात दिलेला निकाल, राज्यपालांची भूमिका या सगळ्या विषयावर बोलताना वकील असिम सरोदे यांनी वादग्रस्त विधान केलं होतं. त्यांच्या वक्तव्यामुळे न्याय व्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्षांचा अपमान झाल्याची तक्रार नोंदवण्यात आली होती. या तक्राराची चौकशी करण्यासाठी ऍड. विवेकानंद घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीनं केलेल्या चौकशीनंतर बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांनी सरोदे यांची सनद ३ महिन्यांसाठी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबईतील वरळी येथील स्टेडियममध्ये एक कार्यक्रम झाला होता. तिथे भाषण करताना सरोदे पक्षफूट, त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेली सुनावणी, राज्यपालांची भूमिका यावर सविस्तर बोलले. तेव्हा त्यांनी राज्यपालांसाठी फालतू हा शब्द वापरला. ते न्याय व्यवस्थेवरही बोलले. त्यानंतर १९ मार्च २०२४ रोजी त्यांच्या विरोधात तक्रार नोंदवण्यात आली. त्यावर ऍड. विवेकानंद घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. सरोदेंचं विधान अशोभनीय, बेजबाबदार आणि बदनामीकारक असल्याचं समितीनं नमूद केलं.

राज्यपालांसंदर्भात बोलताना सरोदे यांनी फालतू शब्द वापरला होता. त्यावर आक्षेप घेण्यात आला. तेव्हा सर्वसामान्यपणे बोलताना हा शब्द वापरतो, त्याच पद्धतीनं मी हा शब्द वापरला.

त्यात अपमानाचा हेतू नव्हता, असा प्रतिवाद सरोदे यांच्याकडून करण्यात आला. त्यावर सरोदे हे प्रसिद्ध, वरिष्ठ वकील आहेत. त्यांनी व्यवस्थेबद्दल अशी भाषा वापरणं योग्य नव्हे, असं समितीनं म्हटलं. समितीनं त्यांना लेखी माफी मागण्याची संधी दिली होती. पण सरोदे यांनी ती नाकारली. यानंतर सरोदे यांची सनद ३ महिन्यांसाठी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम

# २१ डिसेंबर रोजी होणार खारघर येथे भव्य कार्यक्रम



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त जिल्ह्यात दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी खारघर येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती, शीख-सिकलीकर, बंजारा लमाण, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज आढावा बैठकीत दिले.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ. रविंद्र शेळके, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र राठोड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सूर्यवंशी यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष तर काही अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे पुढे म्हणाले की, हिंद-की- चादर श्री. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यात नांदेड, नागपूर व नवी मुंबई या तीन ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाकरिता क्षेत्रीय आयोजन समिती स्थापन करण्यात येत असून या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता वेळोवेळी आढावा घेवून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, कार्यक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शक समिती तसेच आयोजन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करून त्यांची वेळोवेळी आढावा बैठक घेणे व त्याची माहिती राज्यस्तरीय समितीस व अल्पसंख्याक विकास विभागास सादर करावयाची आहे.

या कार्यक्रमाचे योग्य नियोजन, परिणामकारक अंमलबजावणी याकरिता आयोजन समन्वय समिती, व्हीआयपी व्यवस्थापन समिती, सभागृह व्यवस्थापन समिती, प्रशासन व्यवस्थापन समिती, मैदान व्यवस्थापन समित्ती, मंडप व्यवस्थापन समिती, बैठक व स्वागत व्यवस्थापन समिती, अतिथी व्यवस्थापन समिती, निवास व्यवस्थापन समिती, नाव नोंदणी व्यवस्थापन समिती, प्रदर्शनी व्यवस्थापन समिती, प्रचार व प्रसार व्यवस्थापन समिती, दक्षता व्यवस्थापन समिती, महिला सुरक्षा व्यवस्थापन समिती, आपात्कालीन व्यवस्थापन समिती, पाणीपुरवठा व्यवस्थापन समित्ती, स्वच्छता व्यवस्थापन समिती, स्वरुपा व्यवस्थापन समिती, सार्वजनिक परिवहन व्यवस्थापन समिती, जूताघर व्यवस्थापन समिती, लंगर व्यवस्थापन समिती तसेच स्थानिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. आपल्या जिल्ह्याला या कार्यक्रमाच्या आयोजनाची ही उत्तम संधी मिळाली असून सर्व यंत्रणांनी मिळून हा कार्यक्रम अत्युत्कृष्ट होईल, यासाठी एकदिलाने प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शेवटी केले.

# वादळानंतर मत्स्यव्यवसाय विभागाला जाग आल्याने करंजा येथे तातडीने जनजागृती कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । उरण**

मोंथी वादळात भरकटलेल्या मच्छीमार बोटी सुरक्षितरित्या विविध बंदरात दाखल झाल्यानंतर मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग आली आहे.

जाग आलेल्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी मच्छीमारांमध्ये जनजागृती करण्यासाठी काल सोमवारी करंजा-उरण आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून मासेमारी करणाऱ्या सर्व खलाशी, तांडेल यांनी सुरक्षिततेसाठी ट्रान्सपॉट, व्हीटीएस,व्हीएचएन, वीमा आणि केंद्र,राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन मत्स्यव्यवसाय सह आयुक्त युवराज चौगुले यांनी केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना आवश्यक असलेल्या सर्व बाबींची खबरदारी घेण्याची शपथही दिली.

सात दिवसांपुर्वी अरबी समुद्रात मोंथा वादळात राज्यातील अनेक मच्छीमार बोटी भरकटलेल्या होत्या. भरकटलेल्या मच्छीमार बोटी खलाश्यांसह सुखरूप विविध बंदरात दाखल झालेल्या आहेत.मात्र या वादळात भरकटलेल्या मच्छीमार बोटींशी संपर्क होऊ शकला नसल्याने मालक, तांडेल व खलाशी व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

या दरम्यान खोल समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या अनेक मच्छीमार बोटीतील ट्रान्सपॉट, व्हीटीएस आदी यंत्रणा बंद करून ठेवण्यात आल्याचे आढळून आले होते.अथवा या यंत्रणांचा मच्छीमार वापर करण्याचे टाळत असल्याचे दिसून आले आहे.भरकटलेल्या मच्छीमार बोटींमध्ये संपर्कासाठी असलेल्या या यंत्रणा कार्यान्वित नसल्यानेच वादळात भरकटलेल्या मच्छीमार बोटींशी संपर्क साधणे शक्य होऊ शकले नव्हते.

यामुळे जाग आलेल्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्तांनी खलाशी , तांडेल व मच्छीमारांसाठी तातडीने करंजा -उरण येथे जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता.

काल सोमवारी मत्स्यव्यवसाय विभागाचे सह आयुक्त युवराज चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली करंजा येथील द्रोणागिरी देवीच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा, रायगड जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील, परवाना अधिकारी सुरेश बागुलगावे,नांदोस्कर, अखिल महाराष्ट्र मच्छीमार, कष्टकरी खलाशी महासंघाचे अध्यक्ष विकास दाभोळकर, उपाध्यक्ष विष्णू नाटेकर, कोकणातील विविध मच्छीमार संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, खलाशी, तांडेल, बोट मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण हास्यास्पद; निवडणूक याद्यांच्या घोळाबद्दल मनसेचे जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्युत्तर

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या निवासस्थानी १३० मतदारांची नोंदणी झाल्याच्या वृत्तावर जिल्हा प्रशासनाने दिलेले स्पष्टीकरण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) फेटाळले आहे. मनसेचे नवी मुंबई शहराध्यक्ष गजानन काळे यांनी ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण हे हास्यास्पद असल्याची टीका केली आहे. सोमवारी (३ नोव्हेंबर) मनसेच्या पत्रकार परिषदेत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्पष्टीकरणावर जोरदार आक्षेप नोंदवला.

मनसेने नवी मुंबईतील बेलापूर मतदार संघातील मतदार नोंदणीत मोठे घोळ असल्याचा आरोप केला आहे. सार्वजनिक शौचालयांपासून ते थेट महापालिका आयुक्त निवासस्थानापर्यंत मतदारांची नोंदणी आढळून आली आहे. महापालिका आयुक्तांच्या निवासस्था-नी १३० मतदारांची नोंद असल्याने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेतल्यानंतर, जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी शुक्रवारी (३१ ऑक्टोबर) स्पष्टीकरण दिले होते. संबंधित यादीतील मनपा आयुक्त निवास हा केवळ ओळखचिन्ह (लँडमार्क) म्हणून नमूद असून, कोणताही मतदाराचा पत्ता प्रत्यक्षात आयुक्तांचे निवासस्थान असा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

जिल्हाधिकाऱ्यांच्या या स्पष्टीकरणावर गजानन काळे यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. मतदार यादीतील घोळ स्पष्टपणे दिसत आहेत. आयुक्त निवासाचा उल्लेख 'ओळखचिन्ह' म्हणून केला असला तरी, त्या विभागात वास्तव्यास नसलेल्या लोकांची नावे यादीत आढळली आहेत, असे काळे म्हणाले.

काळे यांनी पत्त्यातील त्रुटींवर बोट ठेवत म्हटले आहे की, पत्ता लिहिताना मतदाराच्या घराचा क्रमांक, सोसायटी किंवा इमारतीचे नाव या महत्त्वाच्या गोष्टी लिहिलेल्या नाहीत. तसेच, लँडमार्क असेल तर 'जवळ' किंवा 'बाजूला' असे लिहिलेलेही आढळलेले नाही. हा गंभीर प्रशासकीय निष्काळजीपणा असून, केवळ 'लँडमार्क' सांगून जबाबदारी झटकता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्याशिवाय, या १३० मतदारांपैकी ४० जणांनी विधानसभा निवडणुकीत मतदान केल्याचा पुरावा मनसेने शोधून काढला असून, येत्या काही दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांना तो सादर करण्यात येणार असल्याचेही गजानन काळे यांनी स्पष्ट केले.

त्यामुळे येत्या दोन दिवसांत जिल्हाधिकारी, निवडणूक अधिकारी आणि पोलिंग एजेंटने मनसेने सोबत यावे आणि या मतदारांचे घर क्रमांक आणि पत्त्यासहित नावे शोधून दाखवावीत. त्यानंतरच 'आयुक्त निवास' हा लँडमार्क आहे हे आम्ही मान्य करू असे आवाहन गजानन काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केले आहे.

याचबरोबर, जुईनगरमधील सुलभ शौचालयावर मतदार नोंदणी प्रकरणाबाबतही जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण अपुरे असल्याचे मनसेने म्हटले आहे. दीड वर्षांपूर्वी जर ती व्यक्ती तिथे राहत होती तर आता दीड वर्षांनंतरही त्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळण्यात का आले नाही? असा सवाल काळे यांनी उपस्थित केला आहे.

